सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यालय

खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे, ४००६०१, दूरध्वनी क्रमांक - ०२२ - २५४४३६३६
Email - cp.thane.confibr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/गोशा/विधी अधिकारी नियुक्ती/ ६२० /२०२५, दि. १७/०२/२०२५

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.अेपीआ ३१०६/प्र.क्र./२२७/ पोल ३,दि.२१/०८/२००६
२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसपीपी-२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०,दि. १५/०१/०६
३) महराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक एपीओ-२००५/प्र.क्र२४७/पोल-१०,दि.२६/०६/०७
४) या कार्यालयाचे आदेश क्रमांक ठाआ/गोशा/विधी अधिकारी नियुक्ती/४८०/२४, दि. १६/०३/२०२४
५) या कार्यालयाचे आदेश क्रमांक ठाआ/गोशा/विधी अधिकारी नियुक्ती/४९०/२४, दि. १६/०३/२०२४
६) या कार्यालयाचे आदेश क्रमांक ठाआ/गोशा/विधी अधिकारी/५५७/२४, दि. २६/०३/२०२४

विषय :- विधी अधिकारी गट - अ, विधी अधिकारी गट - ब आणि विधी अधिकारी या पदावर ११ महिन्यासाठी पूर्णतः कंत्राटी पध्दतीने केलेल्या नियुक्तीस पुढील ११ महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत.

---ooo---

आदेश :-

ठाणे शहर पोलीस आयुक्त यांचे अधिनस्त कार्यालयातील विधी अधिकारी गट - अ, विधी अधिकारी गट - ब आणि विधी अधिकारी या पदाकरीता खालील नमूद विधी अधिकारी यांची संदर्भ क्र. ०४ व ०५ च्या आदेशान्वये ११ महिन्याच्या कालावधीकरीता खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पूर्णतः कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आली होती.

अ.क्र.	विधी अधिकारी यांचे नाव	पद	नेमणूकीचे कार्यालय
१	श्री. संजय विलास वैदय	विधी अधिकारी गट - अ	पोलीस आयुक्त, कार्यालय ठाणे शहर
२	श्री.सुनिल सावळाराम अधिकारी	विधी अधिकारी गट - ब	पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ व ४ कार्यालय, ठाणे शहर
३	श्री.सुनिल सिताराम घोलप	विधी अधिकारी	स.पो.आ.भिवंडी पुर्व व पश्चिम विभाग कार्यालय
४	श्रीमती गीताबाई दत्तात्रय साळुंखे	विधी अधिकारी	स.पो.आ.अंबरनाथ विभाग, कार्यालय
५	श्री.मिलींद श्रीधर जाधव	विधी अधिकारी	स.पो.आ.नौपाडा विभाग, कार्यालय
६	श्री.नितीन केरु सोनावणे	विधी अधिकारी	स.पो.आ.कल्याण विभाग, कार्यालय
७	श्रीमती अंजली नानासाहेब गोरे	विधी अधिकारी	स.पो.आ.डोंबिवली विभाग, कार्यालय
८	श्रीमती स्मिता स्मराव शिंपी	विधी अधिकारी	स.पो.आ.वागळे इस्टेट विभाग, कार्यालय

२. उक्त नमूद विधी अधिकारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर देण्यात आलेली नियुक्ती दिनांक २८/०२/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने सदर दिनांकानंतर त्यांच्या नियुक्तीस खंड देण्यात येत आहे.

३. उक्त नमूद विधी अधिकारी यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर दिनांक ०३/०३/२०२५ ते दिनांक ०२/०२/२०२६ या ११ महिन्याच्या कालावधीकरिता खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पूर्णतः कंत्राटी पध्दतीने पुनःश्च (दुस-यांदा) नियुक्ती करण्यात येत आहे.

२/-

अटी व शर्ती :-

१) विधी अधिकारी गट - अ, विधी अधिकारी गट - ब आणि विधी अधिकारी या पदाचे मानधन खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	पदाचे नाव	वेतन
१	विधी अधिकारी गट अ	मासिक वेतन रु. ३०,०००/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रु. ५,०००/- **एकुण मासिक देय रक्कम रुपये ३५,०००/-**
२	विधी अधिकारी गट ब	मासिक वेतन रू. २५,०००/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रू. ३,०००/- **एकुण मासिक देय रक्कम रूपये २८,०००/-**
३	विधी अधिकारी	मासिक वेतन रू. २०,०००/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रू. ३,०००/- **एकुण मासिक देय रक्कम रूपये २३,०००/-**

२) सदरची नियुक्ती ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असून, सदर विधी अधिका-यांना शासकीय अधिकारी/ कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाही.

३) सदरची नियुक्ती ही ११ महिन्याच्या कालावधीसाठी पूर्णत: कंत्राटी पध्दतीची असल्याने, उमेदवाराने शासन निर्णय क्र. एसपीपी २००५/प्रक्र २४७/पोल १०, दि. १५/०९/२००६ मध्ये दिलेल्या करार पत्रानुसार तसे करार पत्र (Agreement) करुन देणे आणि त्यामध्ये नमूद केलेल्या अटीच्या अधीन राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

४) निवड झालेल्या उमेदवारांना सक्षम प्राधिका-याच्या पूर्व परवानगीशिवाय खाजगी वकीली व्यवसाय करता येणार नाही.

५) निवड झालेल्या उमेदवारास प्रत्येक आठवडयात नेमलेल्या कामकाजासाठी कायदेविषयक सल्ला देण्यासाठी कमीत कमी ३० तासांचा कालावधी देणे बंधनकारक राहील.

६) निवड झालेल्या उमेदवाराने ११ महिने सेवा केल्यानंतर त्याच्या सेवेची आवश्यकता असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि अशी मुदत वाढविताना ११ महिन्यापेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त तीन वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारांस पुन:श्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

७) उमेदवाराची निवड ही पूर्णत: तात्पुरती ११ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीची असल्याने त्यांची सेवा समाधानकारक नसल्यास किवा त्यांचे गैरवर्तन आढळून आल्यास त्यांची सेवा कोणत्याही वेळी कोणतेही कारण नमूद न करता किंवा पुर्वसूचना न देता खंडीत करण्यात येईल.

८) निवड केलेल्या उमेदवारास उपरोक्त नमूद एकत्रीत केलेले वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चा व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

९) सदरील विधी अधिकारी यांच्या नेमणूका हया मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचिका क्र. १९००८ - १९००९/२०१२, ३४७८८- ३४७८९/२०१२ मध्ये मा. सर्वोच्च न्यायलयाने दिनांक १२/०७/२०१६ रोजी दिलेल्या अंतिम निर्णयानुसार करण्यात येत आहेत.

कर्तव्य व जबाबदा-या :-

१) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हताळणे.

२) सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्अनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९) कायदा, सेवा व प्रशासकीय इतर अनुषंगीक कामे पाहणे. तसेच वरीष्ठ कार्यालयाकडून जे काम करण्याबाबत आदेश दिले जातील त्या कामाची पूर्तता वेळेत करणे. सदरबाबत वेगळे मानधन दिले जाणार नाही.

संदर्भीय शासन निर्णयास अनुसरुन तसेच उपरोक्त आदेशास अनुसरुन विधी अधिका-यांचे एकत्रीत अनुज्ञेय मासिक वेतन तसेच दुरध्वनी व प्रवास खर्च हा सन २०२४-२०२५ आणि सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता संबंधित शिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीनुसार भागविण्यात यावा.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर
यांचे आदेशान्वये

(डॉ. श्रीकांत परोपकारी)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १
ठाणे शहर

प्रति,

सर्व संबंधित विधी अधिकारी

प्रत व मार्फत :- पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा/ परिमंडळ ३/ परिमंडळ ४, ठाणे शहर
सहायक पोलीस आयुक्त, भिवंडी पूर्व/ भिवंडी पश्चिम/ अंबरनाथ/ नौपाडा/ कल्याण/ डोंबिवली/ वागळे ईस्टेट विभाग, ठाणे शहर

२/- सदर आदेशाची प्रत आपल्या नेमणूकीतील विधी अधिकारी यांना अदा करून, त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेतलेली प्रत तसेच नमूद विधी अधिकारी कर्तव्यावर हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा. तसेच आपले लक्ष उक्त नमूद आदेशातील अटी व शर्ती तसेच विधी अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदारीकडे वेधण्यात येत असून, आपले नेमणूकीतील संबंधित विधी अधिकारी यांच्याकडून त्याअनुषंगाने कामकाज पूर्ण करून घ्यावे. तसेच नमूद विधी अधिकारी यांना मासिक मानधन मंजूर होण्याच्या अनूषंगाने आवश्यक ती माहिती संबंधित कार्यालयातील लेखा शाखेस दरमहा पुरविण्यात यावी.

प्रत :- अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
कार्यालय अधीक्षक, लेखा शाखा, ठाणे शहर
प्रभारी अधिकारी, सोशल मिडीया सेल, ठाणे शहर (संकेतस्थळ प्रसिध्दीसाठी)
समन्वय अधिकारी, ९ ए एस कक्ष, ठाणे शहर (पोलीस पत्रकामध्ये प्रसिध्दीसाठी)